दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.३ एप्रिल २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २१५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 3 April 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 215 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### ई-केवायसीसाठी ३० एप्रिलपर्यंत संधी

**मुंबई**-राज्य सरकारची 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना आता मोठ्या वादाच्या भोऱ्यात सापडण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सुरू झालेल्या या योजनेत तब्बल ७१ लाख महिला अपात्र ठरल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, या अपात्र महिलांच्या खात्यावर गेल्या २० महिन्यांत सरकारने सुमारे २१ हजार ३०० कोटी रुपये जमा केले आहेत.२०२४ पासून लाडकी बहीण योजना सुरू असून महिलांच्या खात्यात दर महिन्याला दीड हजार रुपये जमा होत आहेत. सुरुवातीला तब्बल २ कोटी ६२ लाख अर्ज दाखल झाले होते. मात्र, छाननीमध्ये अनेक त्रुटी समोर आल्या. चारचाकी वाहन असणे, कुटुंबातील सदस्य सरकारी सेवेत असणे किंवा तांत्रिक कारणांमुळे जवळपास १० लाख महिला आधीच अपात्र ठरल्या होत्या. योजनेत अनेक अपात्र महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यानंतर पात्र महिलांची खातरजमा करण्यासाठी राज्य सरकारने ई-केवायसी बंधनकारक केली होती.

# राज्यात अवकाळीचा फटका:पावसामुळे बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत दिली जाईल-कृषिमंत्री दत्तात्रय भरणेंचे आश्वासन





**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे (वृत्तसंस्था)**

राज्यात वादळी वारा व गारांच्या पावसामुळे (अवकाळी) १ लाख २२ हजार हेक्टरहून (३ लाख ५ हजार एकर) अधिक क्षेत्रावरील शेती पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यभरातील नुकसानीची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेऊन तातडीने पंचनामे पूर्ण करुन बाधित शेतक-यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल, अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज भोर तालुक्यातील वडगाव डाळ येथे भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली आहे. या दौऱ्यादरम्यान त्यांनी गावातील नुकसान झालेल्या आंब्याच्या बागांचे तसेच विविध शेती पिकांचे प्रत्यक्ष पाहणी केली. अवकाळी पावसामुळे आंबा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे यावेळी निदर्शनास आले. अनेक ठिकाणी फळगळ, झाडांचे नुकसान तसेच उभ्या पिकांवर परिणाम झाल्याचे दिसून आले. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.मार्च महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे राज्यभर मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः नाशिक (२९,८१२ हेक्टर), अहिल्यानगर (२३,६३३ हेक्टर), जळगाव (२२,३६१ हेक्टर), धुळे (१४,८३२ हेक्टर), बुलढाणा (८,५०७ हेक्टर) व छत्रपती संभाजीनगर (८,४४५ हेक्टर) आदी जिल्ह्यातील लाखो हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त झाली आहेत.राज्यात केळी, गहू, मका, हरभरा, आंबा, ज्वारी, टरबूज, कलिंगड, भाजीपाला, डाळिंब, कांदा, संत्रा,



द्राक्ष आदी पिकांचे तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अनेक ठिकाणी कांदा कुजला असून पपईची रोपेही खराब झाली आहेत. शेतात पाणी साचल्याने उभी पिके आडवी झाली असून मजुरी व खतांचा खर्च वाया गेला आहे.यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे वेळेत पूर्ण करून बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत दिली जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार हे शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, अशी सर्व बांधवांना विनंती आहे.

## शिक्षण विभागातील प्रश्नांवर आमदार सुधाकर अडबाले यांची शिक्षण मंत्र्यांशी भेट; विविध मागण्यांचे निवेदन सादर



**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान आमदार सुधाकर अडबाले यांनी विधान भवन येथे राज्याचे शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची भेट घेऊन शिक्षण विभागातील विविध प्रलंबित मागण्यांबाबत चर्चा केली व निवेदन सादर केले.या वेळी संचमान्यता दुरुस्ती, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन स्थगित ठेवणे, तसेच बीएलओची कामे न स्वीकारणाऱ्या शिक्षकांवर कोणतीही कारवाई करू नये, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच शासन निर्णय २३ ऑगस्ट २०२४ नुसार शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊ नयेत, याकडेही लक्ष वेधण्यात आले.चंद्रपूर येथे बीएलओ म्हणून कार्यरत असलेल्या शिक्षकाला मारहाण झालेल्या घटनेचा मुद्दा उपस्थित करत या प्रकरणात तात्काळ कारवाई करण्याची मागणी अडबाले यांनी केली. याशिवाय, १८ मार्च २०२६ च्या इतिवृत्तानुसार पत्र निर्गमित करण्यात यावे आणि तोपर्यंत समायोजन प्रक्रिया स्थगित ठेवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत मंत्री दादाजी भुसे यांनी संबंधित सचिवांशी संपर्क साधून आवश्यक पत्र निर्गमित करण्याबाबत सूचना दिल्याची माहिती मिळाली.या प्रसंगी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अमरावती शिक्षक मतदार संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू तसेच राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष अनिल भारसाकळे उपस्थित होते.

## लाडक्या बहिणींना फडणवीस सरकारचा मोठा दिलासा: ई-केवायसीला ३० एप्रिलपर्यंत संधी

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील महिलांसाठी महत्त्वाची असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी या योजनेतील ई-केवायसी दुरुस्तीसाठी मुदत वाढवण्यात आल्याची घोषणा केली आहे. यापूर्वी ही अंतिम तारीख ३१ मार्चपर्यंत होती, मात्र आता ती थेट ३० एप्रिलपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे लाभार्थी महिलांना कागदपत्रे आणि माहिती दुरुस्त करण्यासाठी आणखी एक महिना मिळाला आहे.या निर्णयामागे राज्य सरकारची स्पष्ट भूमिका असल्याचेही तटकरे यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सूचनेनुसार ही मुदतवाढ देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील जास्तीत जास्त महिलांना योजनेचा लाभ मिळावा आणि तांत्रिक कारणांमुळे कोणीही वंचित राहू नये, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचेही त्यांनी सांगितले.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै २०२४




पासून राज्यात सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. या योजनेमुळे अनेक कुटुंबांना आधार मिळत असून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळत आहे. मात्र ई-केवायसी प्रक्रियेत काही महिलांकडून त्रुटी राहिल्यामुळे त्यांना अडचणी येत होत्या. त्यामुळे ही मुदतवाढ शेवटची संधी, असल्याचेही तटकरे यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, भोंदू अशोक खरात प्रकरणावरून सुरू असलेल्या टीकेलाही आदिती तटकरे यांनी उत्तर दिले. या प्रकरणावरून केली जाणारी टीका दुर्दैवी असल्याचे त्यांनी म्हटले. घटना समोर आल्यानंतर सर्वप्रथम प्रतिक्रिया देणाऱ्यांमध्ये आपण होतो, असे त्यांनी सांगितले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात एसआयटी स्थापन केली असून तिचे नेतृत्व अनुभवी महिला पोलिस अधिकाऱ्यांकडे दिले असल्याचे त्यांनी नमूद केले.पीडित महिलांना न्याय मिळणे हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगत तटकरे यांनी स्पष्ट केले की, दोषींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे. सरकारची भूमिका ठाम असून तपास प्रक्रियेत कोणतीही ढिलाई होणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महिलांवर अन्याय झाल्यास त्यांच्यासाठी न्याय मिळवून देणे हीच सरकारची भूमिका असल्याचे त्यांनी पुन्हा अधोरेखित केले.

**दादा नसताना विलिनीकरणाच्या चर्चेत फरक**

विलिनीकरणाच्या मुद्द्यावरही आदिती तटकरे यांनी भाष्य केले. सुनील तटकरे यांनी केलेल्या वक्तव्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, 'दादा' जिवंत असताना आणि त्यांच्या पश्चात झालेल्या विलिनीकरणाच्या चर्चांमध्ये मोठा फरक आहे. त्या काळात अचानक झालेल्या घटनेमुळे आणि विविध वक्तव्यांमुळे पक्षात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.

**सुसंघटित चर्चा झाली होती**

तटकरे पुढे म्हणाल्या की, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये या विषयावर सुसंघटित चर्चा झाली होती, मात्र अजित पवार यांच्या गटात तशी सुसंगत भूमिका दिसली नाही. तसेच दादांनंतर सुनेत्रा पवार यांना राष्ट्रीय अध्यक्ष करावे, अशी कोणतीही अधिकृत भूमिका मांडली गेली नव्हती. या सर्व गोष्टींमुळे पक्षांतर्गत संभ्रम वाढल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## शेती जमिनीवर अतिक्रमणाचा गंभीर प्रकार कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

संत चोखामेळा सहकारी संस्था मर्यादित, परळी वै. यांच्या मालकीच्या शेती जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. सन १९६१-६२ पासून सभासद असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर शेजारील काही व्यक्तींनी बेकायदेशीर कब्जा करून बांधकाम सुरू केल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सर्व्हे नं. ४४० मधील मेसाजी आबाजी जगतकर व सिताराम भोजाजी जगतकर यांच्या सुमारे १० गुंठे जमिनीवर उत्तम भिमा राठोड व संतोष नामदेव राठोड यांनी अतिक्रमण करून थेट बांधकाम सुरू केले आहे. संबंधित बांधकाम तात्काळ थांबवून अतिक्रमण हटविण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच, सर्व्हे नं. ४३९ मधील रामकिशन मिराजी जगतकर यांच्या जमिनीवर रमेश उत्तम गित्ते यांनी १० ु १०० फुट जागेवर कब्जा करत विहिरीचे साहित्य टाकले आहे. हे



साहित्य तातडीने हटवून जमीन मूळ मालकांच्या ताब्यात देण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, सर्व्हे नं. ४३९ मधील लक्ष्मण नारायण जगतकर व रानबा किशन ताटे यांच्या जमिनीवर एका शेजार्याने तब्बल एक ते दीड एकर क्षेत्रावर बांधकाम व तळ्याचे साहित्य टाकून अतिक्रमण केल्याचा आरोप आहे.

या सर्व प्रकरणामुळे संत चोखामेळा सहकारी संस्थेचे सभासद आक्रमक झाले असून, प्रशासनाने तात्काळ कारवाई करून अतिक्रमण हटवावे, अन्यथा आम्हाला सनदशीर मार्गाने आमरण उपोषणाला बसावे लागेल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित हस्तक्षेप करून बेकायदेशीर बांधकाम थांबवावे व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी मोकिंद कोंडीबा जगतकर, ब्रिजेस मेसाजी जगतकर, राजेभाऊ साधु मस्के, चंद्रकांत साधु इंगळे, मधुकर विश्वनाथ जोगदंड, राजेभाऊ विठ्ठल जगतकर आदींनी केली आहे. आता प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## डाळज ते कळस-वालचंदनगर रस्त्याचे काम तात्काळ सुरू करा-मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

### कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रयत्नांना यश!

**दैनिक वादळ वार्ता**
**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील राज्य महामार्ग क्रमांक ९९ अंतर्गत डाळज ते कळस-वालचंदनगर या रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागला आहे.

सदर रस्ता काही तांत्रिक व प्रशासकीय अडचणींमुळे दिर्घकाळ प्रलंबित राहिला होता.त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागत होता.दळणवळणाची समस्या तीव्र झाली असून,स्थानिक पातळीवर याबाबत अनेक आंदोलनेही झाली होती.



या पार्श्वभूमीवर स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी,सरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्यांनी हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे पाठपुरावा केला होता.याची दखल घेत भरणे यांनी तात्काळ सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याशी संपर्क साधून मंत्रालयात बैठकीचे आयोजन केले.दि.०१ एप्रिल रोजी मंत्रालयात झालेल्या या बैठकीत संबंधित विभागाचे अधिकारी तसेच वालचंदनगर कंपनीच्या अधिकाऱ्यांमध्ये समन्वयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.बैठकीदरम्यान सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी अधिकाऱ्यांना रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.या बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी,सचिव, कार्यकारी अभियंता,वालचंदनगर कंपनीचे प्रतिनिधी,तसेच जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रतापराव पाटील आणि जिल्हा परिषद सदस्या निर्मलाताई सागर मिसाळ व इतर मान्यवर उपस्थित होते.

या निर्णयामुळे इंदापूर तालुक्यातील दळणवळणाचा मोठा प्रश्न लवकरच सुटणार असल्याने परीसरातील नागरीकांनी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे आभार व्यक्त केले.

# संपादकीय

## कालसुसंगत दिलासा



घरे किंवा मोकळी जागा खरेदी करण्यासाठी लागू करण्यात येणाऱ्या वार्षिक बाजारमूल्याचे (रेडीरेकनर) दर स्थिर ठेवण्याचा राज्य सरकारचा निर्णय कालसुसंगत आणि व्यावहारिक आहे. नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाकडून यंदाच्या रेड रेकनरच्या दरात पाच ते आठ टक्के वाढीचा प्रस्ताव सुचवण्यात आला होता; मात्र बाजारातील परिस्थिती पाहता रेडी रेकनरच्या दरांमध्ये वाढ करू नये, अशी बांधकाम व्यावसायिकांची मागणी होती. युद्धजन्य परिस्थितीमुळे अर्थव्यवस्थेवर होऊ घातलेल्या परिणामांचा विचार करून राज्य सरकारने या दरांमध्ये वाढ न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एकीकडे गृहबांधणी उद्योग आणि दुसरीकडे ग्राहकांनाही दिलासा मिळाला आहे. विशेषत: गेल्या दोन वर्षांत निवडणूक काळात अशा सवलती अपेक्षित होत्या; मात्र आता सगळ्या निवडणुका पार पडल्यानंतर महसुलावर पाणी सोडण्यास सहसा तयार नसणाऱ्या सरकारने हा निर्णय घेतला, याचा अर्थ ती बाजाराची निकड आहे, असे म्हणावे लागेल.करोनाच्या साथीमुळे भारताप्रमाणेच साऱ्या जगाच्या अर्थव्यवस्थेला फटका बसला होता. रोजगार बुडाल्यामुळे आवश्यक तेवढाच खर्च करण्याशिवाय अनेकांपुढे पर्याय नव्हता. साहजिकच घरखरेदीसारख्या खर्चांबाबत ग्राहकांनी हात आखडता घेतला; तर अनेकांना नव्या घरखरेदीचा विचारही सोडून द्यावा लागला होता. गृहबांधणी हा प्रचंड प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देणारा उद्योग असल्याने त्या क्षेत्राची चाके फिरती राहण्यासाठी सरकारनेही विविध उपाययोजना केल्या. गेल्या काही वर्षांत रेडीरेकनरच्या दरांत माफक वाढ करण्यात आली.राज्यातील प्रमुख शहरांमध्ये आधीच घरांचे दर गगनाला भिडले आहेत. सरकारच्या धोरणांमुळे चटईक्षेत्र मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले असले, तरी जमिनींना सोन्याचे दर आले आहेत. त्यातच बांधकाम साहित्याच्या दरांतही सातत्याने वाढ होत आहे. याबरोबरच केंद्र-राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे विविध कर-उपकर यांचाही त्यात मोठा वाटा आहे. या सर्वांचा बोजा अंतिमत: ग्राहकांवरच पडतो आणि घरांच्या किमती वाढत राहतात. युद्धस्थितीमुळे इंधन दरवाढीची भीती असून, त्यामुळे एकंदर महागाई वाढण्याची भीती आहे. बांधकाम साहित्य आणि कच्च्या मालाच्या दरांमध्ये मोठी वाढ झाल्याने घरांचा निर्मितीखर्च वाढला आहे.दुसरीकडे युद्धजन्य स्थितीत अनेक उद्योग बंद पडत असून, त्यांच्यावर अवलंबून लघुउद्योग आणि तेथील हजारो कामगारांना रोजगार गमावण्याची चिंता सतावत आहे. अशा काळात राज्य सरकारचे या क्षेत्रावर करांचा अधिक बोजा न टाकण्याचे धोरण हे अनिश्चिततेच्या काळात उचललेले सावध पाऊल म्हणता येईल. अर्थात रेडीरेकनरचे दर वाढले नसले, तरी राज्यातील अनेक शहरांचे विकास आराखडे आणि प्रादेशिक आराखडे मंजूर झालेले आहेत. तेथील जागांची सद्यस्थिती कागदोपत्री बदलल्याने त्यापोटी अधिक मुद्रांक शुल्काची भर सरकारी तिजोरीत पडू शकते. गेल्या वर्षी रेडीरेकनरमध्ये माफक वाढ झाली, तरी एकूण मालमत्ता खरेदीच्या व्यवहारांचे प्रमाण ४६ लाखांपर्यंत वाढले आहे. त्यामुळे दरवाढ न करताही अधिक महसूल मिळू शकतो, असाही विचार सरकारने केलेला दिसतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेमध्ये करोनाकाळासारख्या आव्हानांची तयारी ठेवण्याचे सूतोवाच केले होते; केंद्र सरकारनेही विविध उद्योगांना मदतीचा हात देऊ केला आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या या निर्णयाकडे बघावे लागेल.

महाराष्ट्र हे साऱ्या देशात शहरीकरणात आघाडीवर असलेले राज्य असल्याने मुंबई-पुण्यासह सर्वच शहरे आणि त्यालगत प्रचंड प्रमाणात घरबांधणी सुरू आहे. या क्षेत्रात प्रचंड आर्थिक उलाढाल होत आहे आणि लाखोंच्या संख्येने प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होत आहे. अशा उद्योगातील चलनवलन सुरू ठेवणे, ही साऱ्या अर्थव्यवस्थेची अपरिहार्यता आहे. त्याबरोबरच स्वत:चे घर असावे, असे प्रत्येक नागरिकाचे स्वप्न असते. मात्र, गृहकर्जांचे हप्ते, फर्निचरपासूनचे खर्च आणि सरकारी कर अशा वेगवेगळ्या खर्चांमुळे प्रमुख शहरांमध्ये घरखरेदी आवाक्याबाहेर जाते. हे स्वप्न साकार करण्यासाठी रेडीरेकनरमध्ये दिलासा देण्याबरोबरच परवडणाऱ्या घरांच्या धोरणाला गती देणे, वेगवेगळ्या शहरांमध्ये व लगतच्या परिसरात नगररचना योजना हाती घेणे, सार्वजनिक वाहतुकीची गतिमान साधने पुरवून काही अंतरावर निवासी भागास चालना देणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या वाढत्या वस्तीला पुरेशा पायाभूत सुविधा राबवणे, ही काळाची गरज आहे, हेही लक्षात घ्यायला हवे.

# वॉलमार्ट वृद्धीचा एमएसएमईंना मोफत डिजिटल प्रशिक्षण आणि व्यावसायिक साधनांचे प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र उद्योग संचालनालयाशी सहयोग

दैनिक वादळ वार्ता
**नवी मुंबई । प्रतिनिधी**



वॉलमार्ट वृद्धीने आज महाराष्ट्र शासनाच्या उद्योग संचालनालयाबरोबर त्यांच्या उपक्रम भागीदार आयडियाज टू इम्पॅक्ट फाउंडेशनच्या माध्यमातून सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

ही भागीदारी संपूर्ण महाराष्ट्रात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) वाढीच्या नवीन संधी निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. डिजिटल शिक्षण सुविधा आणि व्यवसाय साधने देऊन एमएसएमईंना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विस्तार, व्याप्ती वाढवण्यास आणि प्रगती करण्यास मदत करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. मुंबई येथे एक एप्रिल रोजी या करारावर स्वाक्षरी करण्यात आली असून भारतातील एक लाख एमएसएमईंना २०२८ पर्यंत सक्षम करण्याच्या वॉलमार्ट वृद्धीच्या मोहिमेतील हा महत्त्वाचा टप्पा आहे.या सहकार्याच्या माध्यमातून महाराष्ट्रातील एमएसएमईंना त्यांची उद्योग क्षमता बळकट करण्यासाठी आणि स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी मोफत वॉलमार्ट वृद्धी प्रशिक्षण आणि डिजिटल साधने उपलब्ध होतील. वॉलमार्ट वृध्दीच्या प्रशिक्षण आणि क्षमता बांधणीच्या प्रयत्नांचा राज्यभरातील उद्योजकांना फायदा देण्यासाठी उद्योग संचालनालय आपल्या जिल्हा उद्योग केंद्रांद्वारे (डीआयसी) या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवेल. हा उपक्रम वस्त्रोद्योग, हस्तकला, कृषी प्रक्रिया, चामड्याच्या वस्तू, तयार कपडे, रेशीम, फर्निचर, दागिने, मिठाई आणि पितळी धातू उत्पादने अशा प्रमुख उद्योगांवर लक्ष केंद्रित करेल. मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये याची सुरुवात होणार आहे.महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन म्हणाले की, एमएसएमई ही महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीमागील प्रेरक शक्ती आहे, जी औद्योगिक वाढ, रोजगार निर्मिती आणि आपल्या राज्याची व्याख्या करणाऱ्या उद्योजकतेच्या भावनेत लक्षणीय योगदान देते. भविष्यासाठी सज्ज एमएसएमई वातावरणाला चालना देण्यासाठी आणि छोट्या व्यवसायांना आजच्या बाजारपेठेत स्पर्धा करण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांनी सुसज्ज करण्यासाठी वॉलमार्ट वृद्धीबरोबरचे आमचे सहकार्य महाराष्ट्र सरकारची वचनबद्धता प्रतिबिंबित करते.वॉलमार्टच्या स्रोत आणि खरेदी विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष जेसन फ्रेमस्टॅड म्हणाले, एमएसएमई क्षेत्र भारताच्या आर्थिक वाढीच्या सर्वात मजबूत प्रेरकांपैकी एक आहे. ते उद्योजकांच्या कल्पकता आणि चिवटपणाने चालते. या भागीदारीच्या माध्यमातून वॉलमार्ट वृद्धी एमएसएमईंना त्यांची क्षमता उलगडण्यासाठी सक्षम करत आहे. डिजिटल साधने, व्यवसाय प्रशिक्षण आणि बाजारपेठेत प्रवेश देऊन करून, हा कार्यक्रम स्थानिक उद्योगांना त्यांची स्पर्धात्मकता वाढवण्यास आणि स्थानिक प्रभावाचे राष्ट्रीय आणि जागतिक संधींमध्ये रूपांतर करण्यास सक्षम करतो.महाराष्ट्रभरातील उद्योजक त्यांच्या व्यवसायाचे आधुनिकीकरण करण्यासाठी, डिजिटल क्षमता बळकट करण्यासाठी आणि व्यापक बाजारपेठेत प्रवेश करण्यासाठी वॉलमार्ट वृद्धीचा लाभ घेत आहेत. राज्यातील यशोगाथा या कार्यक्रमाचा मूर्त परिणाम अधोरेखित करतात. उदाहरणार्थ, ऑनलाईन बेचो या वेगाने वाढणाऱ्या डिजिटल रिटेल कंपनीचे सह-संस्थापक हर्षल गडा यांनी वॉलमार्ट वृद्धीचा वापर ब्रँड पोझिशनिंग सुधारण्यासाठी, पुरवठा साखळी व्यवस्थित करण्यासाठी आणि डिजिटल रिटेल ऑपरेशन्सचे प्रमाण वाढवण्यासाठी केला. वैयक्तिकृत मार्गदर्शनामुळे साधनसामुग्री योग्य प्रकारे वापरण्यास आणि उत्पादन विस्तार करण्यास मदत झाली. त्यामुळे कंपनीला जागतिक बाजारपेठेत दर्जेदार भारतीय उत्पादने आणता आली.

अनिंदिता चौधरी यांच्या नेतृत्वाखालील इकोसर्व्ह इंडिया हा एक शाश्वत, महिलांच्या नेतृत्वाखालील उपक्रम आहे, जो नैसर्गिक धागे आणि जबाबदारीने मिळवलेल्या सामग्रीपासून पर्यावरणास अनुकूल हस्तकला उत्पादने तयार करतो. व्यवसायांनी निसर्ग आपल्याला जितके देतो तेवढेच परत द्यावे या विश्वासावर आधारित असलेल्या इकोसर्व्ह इंडियाला वॉलमार्ट वृद्धीच्या पाठिंब्याचा फायदा झाला. या कार्यक्रमाने कंपनीची डिजिटल चॅनेल, उत्पादन स्थिती आणि कार्यान्वयन कार्यक्षमता यांची समज वाढवली. त्यामुळे त्यांच्या सुमारे ९० टक्के महिला असलेल्या कारागीरांना मोठ्या बाजारपेठेत आत्मविश्वासाने पोहोचता आले.

वॉलमार्ट वृद्धी २०१९ मध्ये सुरू झालेला एक पुरवठादार विकास कार्यक्रम आहे. तो भारतातील एमएसएमईंना आधुनिकीकरण, प्रमाण आणि त्यांच्या देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय महत्त्वाकांक्षा साध्य करण्यासाठी सक्षम करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आला आहे. वॉलमार्टचे जागतिक पुरवठा साखळीतील कौशल्य आणि फ्लिपकार्टची देशव्यापी ई-कॉमर्स पोहोच एकत्र आणून हा कार्यक्रम एमएसएमईना वित्त, मार्केटिंग, मनुष्यबळ व्यवस्थापन, लॉजिस्टिक्स आणि बरेच काही यावर विनामूल्य प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि व्यवसाय सल्ला देतो. वॉलमार्ट वृद्धीने आपल्या स्थापनेपासून भारतातील ७० हजारहून अधिक एमएसएमईंना यशस्वीरित्या प्रशिक्षण दिले आहे.वाढीच्या संधी मिळवण्यासाठी एमएसएमई वॉलमार्ट वृद्धी उपक्रमासाठी येथे नोंदणी करू शकतात.

# उमरोली आदिवासी वाडीत मोफत आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**



अखंड पोलिस सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली संघटनेच्या वतीने उमरोली आदिवासी वाडीत मोफत आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रुप ग्रामपंचायत मधील उमरोली आदिवासी वाडीमध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते सर्वप्रथम संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या हस्ते महापुरुषांना हार घालून कार्यक्रम सुरू करण्यात आला.या आरोग्य शिबिरात डोळे तपासणी, बीपी,शुगर, ताप, गुढघे दुखी,वजन, व सामान्य चाचण्या आणि औषधे वाटप करण्यात आले.

या शिबिरात १५७ नागरिकांनी या आरोग्य शिबिरात सहभाग घेऊन आपल्या आजाराचे निदान करून घेतले. तसेच वाडीतील लहान मुलांना बिस्कीट आणि चॉकलेट खाऊ देण्यात आला. यावेळी या कार्यक्रमात अ. पोलिस मित्र सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली व हिंद (आरक्षी) पोलिस फ्रेंड असोसिएशन नवी दिल्ली संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री डॉ. ज्ञानेश्वर साळोखे, डॉक्टर विशाल बनसोडे, डॉक्टर समीक्षा संतोष भोईर, आयडीबीआय बँक असिस्टंट मॅनेजर निशांत म्हैसने,पोलिस पाटील गणपत वाघमारे, कार्याध्यक्ष सचिन लोंगले, नरेश लोंगले,राम वाघमारे, बाबू पवार, गणपत वाघमारे, शंकर मुकणे, सुनील जाधव, दत्तात्रेय वाघमारे, पांडुरंग मुकणे,तसेच गुड शेपट कॉन्व्हेन्ट शिक्षिका माधुरी साळोखे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची प्रदेश कार्यकारिणी जाहीर

## संघटन सरचिटणीसपदी प्रविणकुमार बिरादार यांची नियुक्ती

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब यांच्या मान्यतेने महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांनी आज महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची नवी प्रदेश कार्यकारिणी जाहीर केली आहे. १२६ जणांच्या या कार्यकारिणीत खजिनदारपदी अनिकेत नवले व अक्षय जैन, संघटन सरचिटणीसपदी प्रविणकुमार बिरादार आणि प्रशासन सरचिटणीसपदी विवेक गावंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय तनवीर विद्रोही, प्रशांत ओगले, प्रथमेश अबनावे, कपिल ढोके, अनुराग भोयर, आमेर अब्दुल सलीम, दिप्तेश परब, आफरीन हुसेन यांची उपाध्यक्ष पदी तसेच ४४ सरचिटणीस आणि ७४ प्रदेश सचिवांची नियुक्ती करण्यात आली आहे.विशेष म्हणजे, या कार्यकारिणीत सर्वसामान्य कुटुंबातील आणि कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या युवक-युवतींना मोठ्या प्रमाणावर संधी देण्यात आली आहे. या कार्यकारिणीत तळागाळात काम करणाऱ्या आणि संघटनेसाठी सातत्याने झटणाऱ्या युवकांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे युवक काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण होणार आहे. या नव्या कार्यकारिणीमुळे युवकांमध्ये काँग्रेस पक्षाबद्दल आणि युवक काँग्रेसबद्दल आशादायी वातावरण निर्माण झाले असून, राज्यभरातून या निर्णयाचे स्वागत आणि कौतुक होत आहे. नव्या कार्यकारिणीतील पदाधिकारी काँग्रेस पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवतील व युवकांच्या प्रश्नांवर जोरदार आंदोलने करतील असा विश्वास युवक प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी व्यक्त केला आहे.

# शिवरायांचे विचार जगणारा नेता महेंद्रशेठ घरत; रोहे तालुक्यातील ग्रामस्थांचे मत

## अथांग समुद्रात लाटांशी झुंज देणारा कोळी समाज-महेंद्रशेठ घरत

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महेंद्रशेठ घरत सध्या रायगड जिल्हाध्यक्ष या नात्याने रायगडच्या दौऱ्यावर आहेत. संघटन सृजन अभियानांतर्गत हा दौरा सुरू आहे. मंगळवारी (ता. ३१ )त्यांनी पेण, रोहे, माणगाव या ठिकाणी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. सोबत काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या रागिणी नायक आहेत. त्या रायगड जिल्हा निरीक्षक आहेत. त्यामुळे त्यांनी प्रत्येक तालुकानिहाय कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांची मते आजमावून घेतली. दरम्यान, महेंद्रशेठ घरत यांनी पाली येथील बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. रायगड जिल्ह्यातील दुर्गम भागातील अनेक मंदिरांना महेंद्रशेठ घरत यांनी सढळ हस्ते देणग्या दिलेल्या आहेत. त्यामुळे रोहे तालुक्यात त्यांचे पदार्पण होताच तेथील देवकान्हे आणि दिव येथील मंदिरात ते गेले. त्यावेळी तेथील ग्रामस्थांनी महेंद्रशेठ घरत यांचे जोरदार स्वागत केले. दिव येथील कोळी समाजाने हनुमान मंदिर बांधले आहे. या मंदिरासाठी महेंद्रशेठ घरत यांनी भरघोस देणगी दिली आहे. त्यामुळे महेंद्रशेठ घरत मंदिरात येणार याची चाहूल लागताच संपूर्ण कोळी समाज त्यांच्या स्वागतासाठी सज्ज झाला होता. 'छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार जगणारा कलियुगातील एकमेव नेता महेंद्रशेठ घरत!' असे यावेळी रोहे तालुक्यातील ग्रामस्थांनी बोलून दाखवले. दिव येथील सुंदर हनुमान मंदिर पाहून महेंद्रशेठ घरत यांना मनस्वी आनंद झाला. आपण योग्य ठिकाणी देणगी दिली आणि ग्रामस्थांनी तिचा योग्य वापर केला आणि देखणे मंदिर बांधले याचे समाधान महेंद्रशेठ घरत यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. यावेळी दिव ग्रामस्थांनी महेंद्रशेठ घरत यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, कोळी समाजावर माझे नितांत प्रेम आहे. अथांग समुद्रात लाटांशी झुंज देणारा कोळी समाज कौतुकास पात्र आहे. हा समाज अहोरात्र कष्ट करून सन्मानाने जगतो. देवावर अपार श्रद्धा ठेवून भक्तिभावाने उत्सव साजरा करून गावात एकोपा ठेवतो. त्यामुळे दिव येथील कोळी समाजाने सुंदर हनुमान मंदिर बांधून गावची शान वाढवली आहे. त्यामुळे दिव ग्रामस्थांचे अभिनंदन!

यावेळी दिव येथील ग्रामपंचायत सदस्य आणि हनुमान मंदिर अध्यक्ष सत्यवान तांडेल, उपाध्यक्ष महादेव तांडेल, सागर हवालदार, शांताराम हवालदार, महेंद्र कठोरे, चंद्रकांत हवालदार आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



# ठाणे पोलिसांकडून अवैध अग्निशस्त्रे व घातक शस्त्रसाठ्यासह सराईत अटकेत

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**




ठाणे पोलिसांकडून अवैध अग्निशस्त्रे व घातक शस्त्रसाठ्यासह सराईत गुन्हेगारास अटक करण्यात यश आले आहे. गुन्हे शाखा, युनिट-३, कल्याणकडुन अवैध अग्निशस्त्रे व घातक शस्त्रे बाळगणारे इसमांवर कारवाई करण्याचे अनुषांगाने रेकॉर्डवरील गुन्हेगार यांचेवर बारकाईने लक्ष ठेवुन असताना गुन्हे शाखा, घटक ३, कल्याणचे सहा. पोलीस निरीक्षक, सर्जेराव पाटील यांना मिळालेल्या गोपनिय बातमीवरून सुरेंद्र पांडुरंग पाटील, वय ५५ वर्ष, धंदा कंन्स्ट्रक्शन, रा. एकविरा बंगला, श्री धनलक्ष्मी अपार्टमेंट बिल्डींग नंबर ५, मोती मिठाईवाल्याचे मागे, दावडी डोंबिवली पुर्व यास सापळा लावुन शिताफिने ताब्यात घेवुन त्याचे राहते घरी छापा कारवाई करण्यात आली. त्याचे राहते घर श्री धनलक्ष्मी अपार्टमेंट मधील बिल्डींग नंबर ५ चे पाचवे माळयाचे टेरेसवरील चप्पल स्टॅडचे पाठीमागील बाजुस लिफ्टचे डकमधुन प्रवेश करण्यासाठी असलेल्या जागेतील गुप्त बेडरूम मधील कपाटात एक विशिष्ट कप्पा बनवलेल्या जागेत ठेवलेले ०३ देशी बनावटीचे पिस्टल, ०१ सिक्सर रिव्हॉल्वर, ०७ गावठी कटट्टे, ०१ रिकामी मॅगझिन, २ एअर गन, ४०५ जिवंत काडतुसे, जिंवत १६७ छरे, २ धारदार लोखंडी तलवार, ३ लोखंडी कोयते, ०१ लोखंडी धारदार सुरा, ०१ बटन चाकु, ०२ लोखंडी रॉड तसेच ०२ मोबाईल फोन व तसेच ३,५२,०००/- रू किमतीच्या भारतीय चलनातील जुन्या व नवीन बनावट नोटा असा एकुन १२,२१,०००/- रूपये (बारा लाख एकवीस हजार रूपये) एकुन किमंतीची अग्निशस्त्रे, घातक हत्यारे व मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला आहे.सदर प्रकरणी इसम नामे सुरेंद्र पांडुरंग पाटील, वय ५५ वर्ष याचेवर मानपाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २८३/२०२६ भारतीय हत्यार कायदा कलम ३,४,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१)१३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयात सुरेंद्र पांडुरंग पाटील, वय ५५ वर्ष यास अटक करण्यात आली असुन त्यावर एकूण १३ गुन्ह्यांची नोंद असून तो सध्या पोलीस कोठडी रिमांडमध्ये आहे. ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, युनिट-३, कल्याणचे सहायक पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील हे करीत आहेत.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत; ८ दिवसांत मदत न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा-राजाभाऊ कदम



दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यात २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते, मात्र शासनाने जाहीर केलेली आर्थिक मदत अद्यापही हजारो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. त्यामुळे शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत असून नाराजी तीव्र होत आहे. या पार्श्वभूमीवर बहुजन संघर्ष सेनेचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कदम यांनी शासनाला ८ दिवसांचा अल्टिमेटम देत आंदोलनाचा इशारा दिला आहे.अतिवृष्टीमुळे सीना नदीला आलेल्या पुरात शेतकऱ्यांची उभी पिके वाहून गेली, शेतीची माती खरडून गेली आणि अनेक जनावरेही दगावली. उजनी परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनींमध्ये पाणी साचल्याने केळी पिकांसह विविध फळबागांचे मोठे नुकसान झाले. त्या वेळी मंत्र्यांनी घटनास्थळी भेट देत मदतीची घोषणा केली होती तसेच पंचनाम्याचे आदेशही देण्यात आले होते. तहसील प्रशासनाने तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या माध्यमातून पंचनामे पूर्ण केले, परंतु प्रत्यक्षात काही शेतकऱ्यांनाच मदत मिळाली असून मोठ्या संख्येने शेतकरी अद्याप वंचित आहेत.मदतीसाठी शेतकरी वारंवार तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवत असले तरी त्यांना समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची तक्रार आहे. या संदर्भात राजाभाऊ कदम यांनी शासनाकडे मागणी करताना स्पष्ट केले की, अतिवृष्टीग्रस्त सर्व शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत मिळावी, पंचनामे होऊनही वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांची नावे व मंजूर रक्कम ग्रामपंचायत स्तरावर जाहीर करावी, तसेच तहसील कार्यालयात येणाऱ्या शेतकऱ्यांशी कर्मचाऱ्यांनी नम्रतेने वागावे.आठ दिवसांच्या आत मदत मिळाली नाही, तर बहुजन संघर्ष सेना शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडेल,असा इशारा कदम यांनी दिला आहे.या वेळी योगेश कोंडलकर, दादा करे, विलास बोराडे, बदर, भाऊ सरडे यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते. या प्रकरणामुळे करमाळा तालुक्यातील शेतकरी वर्गात असंतोष वाढत असून प्रशासनाने तातडीने निर्णय घेण्याची गरज व्यक्त होत आहे.




# दानवे-निकम 'सेटलमेंट'च्या चर्चांनी राजकारण ढवळलं

## अजय पाटील साळुंखे यांचा गंभीर आरोप, वैजापूर तालुक्यात संताप उसळला

दैनिक वादळ वार्ता
**वैजापूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणुकीदरम्यान एकमेकांवर गंभीर आरोप करणारे अंबादास दानवे आणि संजय निकम यांच्यात 'सेटलमेंट' झाल्याचा गंभीर आरोप अजय पाटील साळुंखे यांनी केला आहे. या आरोपामुळे वैजापूर तालुक्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दानवे आणि निकम यांच्यात मोठ्या आर्थिक व्यवहाराचे आरोप समोर आले होते. या आरोपांमुळे काही काळ राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. मात्र त्यानंतर अचानक दोन्ही नेत्यांनी संभाजीनगर येथे एकत्र येत गैरसमजातून आम्ही बोललो असे स्पष्टीकरण दिल्याने जनतेमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

याच मुद्द्यावर बोलताना साळुंखे यांनी थेट सवाल उपस्थित करत म्हटले की, जर आरोप खोटे होते, तर ते आधीच का सांगितले नाही? आणि जर आरोप खरे होते, तर मग अचानक मैत्री कशी झाली? त्यांच्या या विधानामुळे 'सेटलमेंट'च्या चर्चांना अधिकच उधाण आले आहे.साळुंखे यांनी पुढे संतप्त प्रतिक्रिया देत आरोप केला की, राजकारणी स्वतःच्या फायद्यासाठी एकमेकांवर आरोप करतात आणि काम झाल्यावर पुन्हा एकत्र येतात. आधी कोट्यवधी रुपयांच्या व्यवहाराचे आरोप करायचे आणि नंतर



गैरसमज झाला असे सांगून विषय मिटवायचा, हा प्रकार मतदारांचा अपमान करणारा आहे.या प्रकरणानंतर वैजापूर तालुक्यात अनेक ठिकाणी नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून तरुणांमध्येही या विषयावर जोरदार चर्चा सुरू आहे. निवडणुकीच्या वेळी वेगळी भूमिका आणि नंतर वेगळा सूर, हा प्रकार आता सहन केला जाणार नाही, अशा प्रतिक्रिया समोर येत आहेत.दरम्यान, दानवे आणि निकम यांनी या प्रकरणावर स्पष्ट भूमिका मांडावी व जनतेसमोर सत्य मांडावे, अशी मागणी जोर धरत आहे. आरोप खोटे असतील तर स्पष्ट करा, अन्यथा चौकशी व्हावी, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.या संपूर्ण घडामोडींमुळे वैजापूर तालुक्यातील राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघाले असून येत्या काळात या वादाचे मोठे राजकीय पडसाद उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# २५ वर्षांची निष्ठावान सेवा; अशोकराव पांडव यांना यवतमाळ आगाराकडून भावपूर्ण निरोप



दैनिक वादळ वार्ता
**यवतमाळ । प्रतिनिधी**


यवतमाळ आगारातील शांत, कर्तव्यदक्ष व प्रवाशांप्रती सदैव सहानुभूती बाळगणारे कर्मचारी अशोकराव विठ्ठलराव पांडव यांचा सेवानिवृत्ती निमित्त भावपूर्ण निरोप समारंभ पार पडला. तब्बल २५ वर्षांच्या सेवेनंतर त्यांनी सेवेला निरोप दिला.अशोकराव पांडव यांनी आपल्या कार्यकाळात काटोल फेम तसेच धामणगाव स्पेशालिस्ट (८४/८५) या मार्गांवर उत्कृष्ट सेवा बजावत प्रवाशांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या नम्र स्वभावामुळे आणि कर्तव्यनिष्ठेमुळे ते प्रवासी व सहकाऱ्यांमध्ये लोकप्रिय होते.सेवानिवृत्ती निमित्त आयोजित कार्यक्रमात यवतमाळ आगारातील संपूर्ण कर्मचारी वर्गासह धामणगाव, देवगाव व फळेगाव येथील प्रवाशांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. यावेळी सर्वांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमात वक्त्यांनी पांडव यांच्या सेवाभाव, शिस्तबद्ध कार्यपद्धती व प्रवाशांप्रती असलेल्या जिव्हाळ्याचा विशेष उल्लेख केला. प्रवाशांची सेवा हीच खरी सेवा या तत्वावर त्यांनी काम केल्याचे सांगत त्यांच्या कार्याची प्रशंसा करण्यात आली.या भावनिक निरोप समारंभामुळे उपस्थितांमध्ये कृतज्ञतेची भावना व्यक्त होत होती.

# जय बजरंग रोहा कबड्डी संघाचा राज मोरे पुन्हा झेपावला

## राज्य निवड चाचणीसाठी सलग दुसऱ्यांदा रायगड संघात निवड

दैनिक वादळ वार्ता
**रोहा । प्रतिनिधी**

जय बजरंग रोहा कबड्डी संघाचा अष्टपैलू खेळाडू राज ज्ञानेश्वर मोरे याने आपल्या दमदार खेळाच्या जोरावर पुन्हा एकदा राज्य पातळीवर झेप घेतली आहे. त्याची सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्र राज्य निवड चाचणीसाठी रायगड जिल्हा संघात निवड झाली असून, क्रीडावर्तुळात त्याच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.राज मोरे याची क्रीडा वाटचाल सातत्यपूर्ण यशाने भरलेली आहे. सन २०२० मध्ये किशोर गटात त्याने आपल्या संघाला रायगड जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत विजेतेपद मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली होती. त्यानंतर कुमार गटात कर्णधार म्हणून दोन वेळा संघाला विजेतेपद मिळवून देत त्याने आपल्या नेतृत्वगुणांचीही छाप पाडली.त्याच्या उत्कृष्ट



कामगिरीची दखल घेत २०२५ मध्ये रायगड जिल्हा कुमार गट संघाच्या कर्णधारपदी त्याची निवड करण्यात आली. पुढे महाराष्ट्र कुमार गट संघात स्थान मिळवत त्याने राज्य पातळीवरही आपली गुणवत्ता सिद्ध केली.नुकत्याच झालेल्या रायगड जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत त्याने पुन्हा प्रभावी खेळ सादर करत प्रथम ४० खेळाडूंमध्ये स्थान मिळवले. त्यानंतर अंतिम २२ खेळाडूंमध्ये निवड होत जिल्हा सराव शिबिरासाठी पात्र ठरला. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याची नाशिक येथे दि. २ ते ६ एप्रिल २०२६ दरम्यान होणाऱ्या ७३ व्या वरिष्ठ गट पुरुष कबड्डी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा संघात निवड झाली आहे.राज मोरे याची ही यशस्वी वाटचाल मेहनत, शिस्त आणि जिद्दीचे उत्तम उदाहरण ठरत असून जय बजरंग रोहा संघ व संपूर्ण रोहा तालुक्याचा अभिमान उंचावला आहे.या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून जय बजरंग क्रीडा मंडळाचे अध्यक्ष अमर सलागरे यांनी त्याचे विशेष कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आक्षेपार्ह वक्तव्याविरोधात संताप; स्वामी आनंद स्वरूप यांच्यावर कठोर कारवाईची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

अनुसूचित जाती समाजाबद्दल आक्षेपार्ह व अपमानास्पद वक्तव्य केल्याचा आरोप करत स्वामी आनंद स्वरूप यांच्याविरोधात कठोर कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणी विवेक विचार मंचाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देत तीव्र निषेध नोंदविण्यात आला.नाशिक येथील भोंदू मांत्रिक अशोक खरात यांच्याविषयी बोलताना स्वामी आनंद स्वरूप यांनी अनुसूचित जातीतील समाजाबद्दल अपमानास्पद व असंवैधानिक विधान केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच मनुस्मृती व चातुर्वर्ण व्यवस्थेचे समर्थन करत आंबेडकरी समाजाविषयी अवमानकारक शब्द वापरल्याचेही निवेदनात नमूद आहे.या संदर्भात प्रतिक्रिया देताना प्रशांत मुन यांनी सांगितले की, अशा प्रकारची विधाने भारताच्या संविधानातील समता, न्याय व बंधुत्व या मूलभूत मूल्यांना विरोध करणारी आहेत. डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांनी मांडलेल्या सामाजिक समतेच्या विचारांचा अपमान करणारे हे वक्तव्य पूर्णपणे अस्वीकार्य आहे.

विवेक विचार मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवत, संबंधित व्यक्तीवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा तसेच इतर लागू कायद्यांनुसार तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या मागणीचे निवेदन अमरावती जिल्हा विवेक विचार मंचाच्या वतीने तहसीलदार अभय घोरपडे यांना सादर करण्यात आले. यावेळी रवी उर्फ दादू मेश्राम, प्रेम मोटघरे, अमोल देशभतार, सदानंद कांबळे, सिद्धार्थ टाले, आकाश मुन, संदीप रामटेके, कोहिनूर श्रीरामे आदी उपस्थित होते.या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे.

# आता प्रतिक्षा शिर्डीतील 'महाराष्ट्र साई पद्मश्री २०२६' च्या ऐतिहासिक सोहळ्याची!

दैनिक वादळ वार्ता
**शिर्डी । प्रतिनिधी**

ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी. फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पातळीवरील 'महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्कार २०२६' हा भव्य व दिव्य सोहळा २ मे २०२६ रोजी शिर्डीत पार पडणार असून या ऐतिहासिक क्षणाची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. निसर्गरम्य वातावरणात परिवार लॉन्स, बँकेट हॉल येथे सकाळी ९.३० वाजता हा सोहळा संपन्न होणार आहे.साईंच्या पावन भूमीत आयोजित करण्यात येत असलेला हा देशातील पहिलाच 'महाराष्ट्र साई पद्मश्री' पुरस्कार सोहळा ठरणार असून, संपूर्ण महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २०१ मान्यवरांना या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, कृषी तसेच मनोरंजन क्षेत्रातील नामवंत व्यक्तींच्या हस्ते हा सोहळा पार पडणार असून, मोठ्या प्रमाणावर मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित आहे.या सोहळ्यास सुमारे १००० हून अधिक उपस्थित राहणार असून, नेत्रदीपक व संस्मरणीय असा हा कार्यक्रम ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गेल्या चार महिन्यांपासून समितीतील सदस्यांकडून विशेष परिश्रम घेतले



जात आहेत.या पुरस्कार सोहळ्याचे संस्थापक अध्यक्ष सुदाम संसारे यांनी सर्व नागरिकांना या ऐतिहासिक सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन करत, एक दिवस स्वतःसाठी राखून ठेवा आणि या सुवर्णक्षणांचा आनंद घ्या, असे सांगितले.या भव्य सोहळ्यामुळे शिर्डी नगरीत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, राज्यभरातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम विशेष ठरणार आहे.

# नक्षलवाद गोळीने नाही, हक्कांनीच संपेल-खासदार डॉ.नामदेव किरसान यांचा लोकसभेत ठाम आवाज

## गडचिरोली विकासासाठी १० हजार कोटींच्या विशेष पॅकेजची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**ब्रम्हपुरी । प्रतिनिधी**

गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी लोकसभेत नियम १९३ अंतर्गत 'नक्षलवाद' विषयावरील चर्चेत सहभागी होत आदिवासी बांधवांच्या प्रश्नांना ठामपणे वाचा फोडली. नक्षलवाद ही केवळ कायदा व सुव्यवस्थेची समस्या नसून सामाजिक व आर्थिक अन्यायातून निर्माण झालेली आहे. त्यामुळे ही समस्या बंदुकीच्या गोळीने नाही, तर आदिवासींना जल, जंगल व जमिनीचे हक्क देऊनच संपवता येईल, असे स्पष्ट मत त्यांनी मांडले.सभागृहात बोलताना किरसान यांनी नमूद केले की, नक्षलवादी आणि पोलीस यांच्यातील संघर्षात सर्वाधिक फटका सामान्य आदिवासींना बसतो. अनेकदा संशयाच्या आधारावर निरपराध आदिवासींना अटक होते आणि त्यांना वर्षानुवर्षे तुरुंगात राहावे लागते. आदिवासींना 'सॉफ्ट टार्गेट' म्हणून वापरण्याची प्रवृत्ती थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली.



गडचिरोली जिल्ह्यात सुरू असलेल्या लोहखनिज खाणी, विशेषतः सुरजागड प्रकल्पामुळे पर्यावरणीय व सामाजिक परिणाम गंभीर होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. खाणींमुळे जलस्रोत दूषित होत असून आदिवासींना त्यांच्या जमिनीवरून बेदखल केले जात असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.नक्षलवादी हल्ल्यांत मृत्यूमुखी पडलेल्या कुटुंबातील महिलांना 'विशेष पोलीस अधिकारी' (डझज) म्हणून देण्यात आलेल्या तात्पुरत्या नोकऱ्या बंद करण्याच्या निर्णयावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. या महिलांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्याची मागणी त्यांनी अमित शहा यांच्याकडे केली.

तसेच सुरजागड खाण प्रकल्पांतर्गत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात जाहीर करण्यात आलेल्या ट्रक योजनेतील अनियमिततेकडे लक्ष वेधत, ८० आदिवासी तरुणांकडून प्रत्येकी ५० हजार रुपये घेऊनही ना ट्रक देण्यात आले, ना पैसे परत करण्यात आले, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.याशिवाय, पिढ्यानपिढ्या शेती करणाऱ्या आदिवासींना वनविभागाकडून होत असलेल्या त्रासाबाबतही त्यांनी आवाज उठवला. रस्ते व घरबांधणीसाठी अडथळे निर्माण करून त्यांना त्यांच्या हक्काच्या जमिनीवरून दूर केले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.गडचिरोली हा नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशील व आकांक्षी जिल्हा असल्याने पायाभूत सुविधा, रस्ते, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारने १० हजार कोटी रुपयांचे विशेष पॅकेज मंजूर करावे, अशी ठोस मागणी खासदार किरसान यांनी केली.

**उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे मिंडाळा गावातील जुनी जाणती बुजुर्ग मंडळी विस्तीर्ण वटवृक्षाच्या खाली हवेशीर आपसात गप्पा मारत खऱ्या जीवनाचा आनंद घेत आहेत.**



# पोलीस ठाणे वाढवणा (बु.)हद्दीत कॉपर वायर चोरी चोरीच्या ५ प्रकरणांचा उलगडा ५ आंतरराज्यीय आरोपी अटकेत

**दैनिक वादळ वार्ता**
**उदगीर । प्रतिनिधी**

उदगीर तालुक्यातील पोलीस ठाणे वाढवणा (बु.) हद्दीत घडलेल्या कॉपर वायर चोरीच्या सलग घटनांचा उलगडा करण्यात पोलीस प्रशासनास महत्त्वपूर्ण यश प्राप्त झाले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या पाणबुडी मोटारींना जोडलेले कॉपर वायर चोरी करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान करून चोरी करणाऱ्या आंतरराजीय टोळीचा पर्दाफाश करण्यात आला असून या प्रकरणात एकूण पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी पोलीस ठाणे वाढवणा (बु.) येथे गुरनं ७८/२६ व ८०/२६ अन्वये कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. फिर्यादी बालाजी धनराज तरवडे (रा. वाढवणा बु.) व इतर शेतकऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक २६/०३/२०२६ ते २७/०३/२०२६ दरम्यान मौजे एकुर्का रोड परिसरातील साठवण तलावा जवळील डी.पी.वरून सुमारे १०५० मीटर कॉपर वायर (किंमत ८४,०००/-) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले होते. तसेच दुसऱ्या घटनेत डांगेवाडी परिसरातील साठवण तलावावरील डी.पी.वरून ४६१ मीटर कॉपर वायर (किंमत ३६,८८०/-) चोरीस गेले होते. अशा प्रकारे एकूण १२०,८८०/- किमतीचा मुद्देमाल चोरीस गेला होता.

या घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशानुसार तसेच अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण व उपविभागीय पोलीस अधिकारी अहमदपूर अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे वाढवणा (बु.) येथे विशेष तपास पथक गठीत करण्यात आले. तपासादरम्यान घटनास्थळांचे बारकाईने निरीक्षण, तांत्रिक विश्लेषण, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचा अभ्यास, तसेच गोपनीय माहितीदार सक्रिय करून आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू करण्यात आले होते.तपासादरम्यान मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलीस पथकाने वाढवणा पाटी परिसरात सापळा रचून संशयितांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीअंती आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली. अटक आरोपींची नावे पुढीलप्रमाणे रिहाईस जिवराज पवार (वय २४ वर्ष),सुजेश नवाब पवार (वय २६ वर्ष),दुकीस मलबकस पवार (वय ३५ वर्ष),सासन सार्जन पवार (वय २४ वर्ष),बबू जिवराज पवार (वय २६ वर्ष,सर्व रा. सुगवा ललतपुर, ता. रिटी, जि. कटनी, राज्य मध्यप्रदेश)असे असून आरोपींनी वाढवणा, अहमदपूर, जळकोट, उदगीर व कमलनगर (कर्नाटक राज्य) परिसरात अशाच प्रकारच्या चोरीच्या घटना केल्याची कबुली दिली आहे. चोरी केलेले वायर जाळून त्यातून तांबे वेगळे करून ते विक्रीसाठी वापरण्याची त्यांची पद्धत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.



अधिक तपासात असे निष्पन्न झाले आहे की सदरचे आरोपी हे गावाजवळील मोकळ्या जागेत वास्तव्य करून किंवा शेतात कामाच्या बहाण्याने येऊन रेकी करून अशा प्रकारच्या चोऱ्या करत होते.

अटक आरोपींपैकी रिहाईस जिवराज पवार याच्याकडून सुमारे २३ किलो कॉपर वायर जप्त करण्यात आले आहे. तसेच आरोपींकडून रेडमी, विवो व आयक्यू कंपनीचे एकूण ४ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहे. याशिवाय आरोपींकडे सोन्यासारखे दिसणारे प्युअर गोल्ड ९९९ असा ठसा असलेले बनावट धातूचे बिस्कीट स्वरूपातील साहित्यही आढळून आले असून ते पितळ असल्याचे निष्पन्न झाले आहे. या माध्यमातून फसवणुकीचा गुन्हा झाला आहे का? याचाही तपास सुरू आहे.

तपासादरम्यान आरोपींनी चोरी केलेले तांबे काही भंगार विक्रेत्यांना विक्री केल्याची माहिती समोर आली असून त्याबाबत पुढील तपास सुरू आहे. तसेच आरोपींच्या इतर साथीदारांचा शोध व इतर गुन्ह्यांतील सहभागाबाबत सखोल तपास सुरू आहे.

ही संपूर्ण कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे वाढवणा (बु.) चे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड यांच्या नेतृत्वातील पथकामधील तसेच तपासी अधिकारी तुकाराम बळदे, शिवप्रताप रंगवाळ,संजय दळवे , बालाजी आकेमोड, शिवाजी केंद्रे , गोरख कसबे, राजेश कंचे यांच्या पथकाने अत्यंत कौशल्याने पार पाडली आहे. पोलीस अधिकारी व अंमलदारांनी दाखविलेल्या तत्परता, समन्वय व व्यावसायिकतेमुळे अल्पावधीत गुन्ह्याचा उलगडा होणे शक्य झाले.तसेच पोलिसांना आरोपी धरण्यासाठी पोलीस मित्र आकाश नागपूर्णे , सिद्धेश्वर गुद्दे यांनी सहकार्य केले आहे.

सदर प्रकरणातील अटक आरोपींना न्यायालयात हजर करून पुढील तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली आहे.गुन्ह्याचा सखोल तपास सुरू आहे.पोलीस प्रशासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की,
आपले गावात, गावाशेजारी वास्तव्यास किंवा शेतात काम करण्याच्या बहाण्याने कोणीही अनोळखी व्यक्ती अथवा टोळी निदर्शनास येत असेल व आपणास त्यांच्याबद्दल वाजवी संशय येत असेल तर आपण नजीकच्या पोलीस स्टेशनची संपर्क साधून तात्काळ माहिती देण्यात यावी.

# युथ आयकॉन रिपब्लिकन सेनेचे युवा नेते अॅड.अमन आंबेडकर यांचा हदगाव येथे भव्य सत्कार

**दैनिक वादळ वार्ता**
**हदगांव । प्रतिनिधी**

रिपब्लिकन सेनेचे युवा नेते युथ आयकॉन अँड.अमन भैय्या आंबेडकर साहेब हे दि. ३१/०३/२०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. सायं. ७.३० वाजता त्यांचे हदगाव शहरात आगमन झाले.

हदगांव येथील महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथे त्यांचा सर्व बौद्ध समाज बांधवांच्या वतीने व रिपब्लिकन सेना हदगांव तालुक्याच्या वतीने भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळेस उपस्थित बौद्ध बांधव, रिपब्लिकन सेनेचे सर्व पदाधिकारी,समता सैनिक दलातील बांधव,भारतीय बौद्ध महासभा शाखा हदगाव ची पदाधिकारी उपस्थित होते.



त्यानंतर अँड. अमन भैय्या आंबेडकर साहेब यांच्या हस्ते हदगाव तालुक्यातील तळेगाव येथे रिपब्लिकन सेनेच्या शाखा बोर्डाचे अनावरण मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी प्रदेशाध्यक्ष श्री. सुशिल सुर्यवंशी, सुनिल भाऊ सोनसळे, जिल्हाध्यक्ष उत्तर नांदेड, महेंद्र भाऊ धोंगडे विधानसभा अध्यक्ष, हदगाव शहर अध्यक्ष चंद्रकांत भोरे, हदगांव, युवा तालुका अध्यक्ष राष्ट्रदिप वाढवे रिपब्लिकन सेना हदगाव, माधवराव आढागळे, अँड.अतुल चौरे, अँड. सदानंद गजभारे, मारोती काकडे, जनार्दन हाटकर, भिमराव साळवे, शेषेराव वाठोरे, संघपाल पाईकराव, लक्ष्मण जमदाडे, सामाजिक कार्यकर्ते संदिप भाऊ दवणे, साहेबराव नरवाडे व तळेगाव येथील रिपब्लिकन सेना शाखा पदाधिकारी , गावकरी, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

# बडेवाडीत संत भगवान बाबा नारळी सप्ताहानिमित्त १० क्विंटल लाडूंची महापंगत!

**दैनिक वादळ वार्ता**
**पाथर्डी । प्रतिनिधी**

घाटशिळ पारगाव ता. शिरूर कासार जिल्हा बीड ग्रामस्थांच्या वतीने शुक्रवार दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी बडेवाडी येथे संत भगवान बाबा यांच्या ९२ व्या नारळी सप्ताहानिमित्त भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने पारगाव ग्रामस्थांकडून तब्बल १० क्विंटल लाडूंची महापंगत आयोजित करण्यात येणार असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या महापंगतीसाठी मोठ्या प्रमाणात लाडू तयार करण्याचे काम जोरात सुरू असून ग्रामस्थ स्वतः पुढाकार घेऊन नियोजन करत आहेत. सामाजिक एकोपा आणि भक्तिभाव याचे दर्शन घडवणारा हा उपक्रम ठरणार असून हजारो भाविक या महापंगतीचा लाभ घेणार आहेत.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील तरुण, ज्येष्ठ मंडळी तसेच महिला वर्ग मोठ्या उत्साहाने सहभागी झाले आहेत. संत भगवान बाबा यांच्या



कृपेने हा सोहळा अधिक भव्यदिव्य व्हावा, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त शालेय सामान्य ज्ञान परिक्षेच आयोजन

## हिमायतनगर तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा–रमेश पंडित

**दैनिक वादळ वार्ता**
**हिमायतनगर । प्रतिनिधी**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त भव्य शालेय सामान्य ज्ञान परिक्षेच आयोजन जयंती समीतीच्या वतीने करण्यात आले असुन हिमायतनगर तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन रमेश पंडित यांनी केले आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त दि १२ एप्रिल रोजी भव्य शालेय सामान्य ज्ञान परीक्षा बालाजी विद्यालय बोरगडी रोड हिमायतनगर येथे कनिष्ठ स्तर १० ते ११.१० तर वरिष्ठ स्तर ११.१० ते १२.४० वेळ एक तास दहा मिनिटे ठेवण्यात आला आहे.स्पर्धेचे वरिष्ठ



स्तर प्रथम बक्षीस ८००० रुपये रोख व्दितीय बक्षीस ५००० व तृतिय बक्षीस ३००० आहे तर कनिष्ठ स्तर प्रथम बक्षीस ५००० व्दितीय ३००० तृतीय २००० असे आहे परिक्षा शुल्क ५० रूपये राहणार असुन येण्या जाण्याचा खर्च हा परिक्षार्थी यांचा राहणार आहे परिक्षार्थी यांनी कृती समीतीच्या नियमाचे तंतोतंत पालन करावे परिक्षार्थीची निवड ही कृती समितीकडूनच केली जाईल कृती समितीचे परिक्षक म्हणून नागेश कोथळकर,मुजाहिद मिर्झा, सचिन कळसे,विजय धोंडे,विजय वाठोरे,एम.यु.हनवते, भिमराव हनवते ह्या शिक्षकांची निवड करण्यात आली असून जयंती समीती अध्यक्षपदी ऋषीकेश कदम उपाध्यक्ष मनोहर दादा कांबळे सचिव समाधान हनवते सहसचिव प्रविण हनवते कोषाध्यक्ष सिद्धार्थ लोखंडे यांची निवड करण्यात आली असून तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन रमेश पंडित यांनी केले आहे

# तहसील कार्यालयातील जप्त मुद्देमाल चोरी प्रकरणी आरोपी अटकेत

**दैनिक वादळ वार्ता**
**किनवट । प्रतिनिधी**

तहसील कार्यालयाच्या आवारातून जप्त केलेला मुद्देमाल चोरून नेणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अल्पावधीत अटक करून प्रकरणाचा छडा लावला आहे. गंगानगर येथील सोनू संजय माने याला मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले.

तहसील कार्यालयाच्या कंपाऊंडमधील खुल्या जागेत अवैध गौण खनिज प्रकरणात जप्त केलेला सुमारे ३१,५०० रुपयांचा मुद्देमाल ठेवण्यात आला होता. यामध्ये एक लोडिंग ऑटो आणि त्यातील अर्धा ब्रास रेतीचा समावेश होता. २१ मार्च २०२६ रोजी हा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे उघडकीस आले.

याप्रकरणी नायब तहसीलदार चंद्रशेखर सहारे यांनी किनवट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.



पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली गुप्त माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीला अटक करण्यात आली. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून चोरीस गेलेला सर्व मुद्देमाल जप्त केला असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल दिलीप श्रीमनवार करत आहेत. या जलद कारवाईमुळे पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# देगलूर-मुखेड-बिलोली तालुक्यात बालाजी पाटील यांचा दौरा शिवसेनेला वाढती ताकद, स्थानिक राजकारणात हालचालींना वेग

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांनी नुकताच देगलूर, मुखेड व बिलोली या तीन तालुक्यांसह शहरी भागाचा दौरा करून अनेक माजी-आजी पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी घेतल्या. त्यांच्या या दौऱ्यामुळे शिवसेना पक्षाला नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र दिसून येत आहे.

बालाजी पाटील यांनी अत्यंत विनम्र व प्रेमळ स्वभावाने सर्वांशी संवाद साधत स्थानिक समस्या, नागरिकांच्या अडचणी व संघटनात्मक बांधणी यावर चर्चा केली. त्यांच्या साध्या व आपुलकीच्या स्वभावामुळे अनेक नागरिक व पदाधिकारी प्रभावित झाले असून शिवसेनेप्रती सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा दौरा पूर्वतयारीचा भाग तर नाही ना, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असून विरोधकांनीही या दौऱ्याची दखल घेतल्याचे बोलले जात आहे.

देगलूर तालुक्यात मागील एक महिन्यापासून शिवसेना व युवासेना वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये विधी हेल्पलाईन (९७६३६८६७३७), पाणी पोई, तसेच नागरिकांच्या सोयीसाठी विविध जनसंपर्क उपक्रम राबविण्यात येत आहेत. या



उपक्रमांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून पक्ष संघटना मजबूत होत असल्याचे चित्र आहे.

बालाजी पाटील यांच्या दौऱ्यात देगलूर तालुक्यातील रमेशजी देशमुख शिळवणीकर यांच्या तब्येतीची विचारपूस करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच प्रसिद्ध कादंबरीकार बाबू बिरादार सर यांच्या स्मृतीस अभिवादन करून त्यांच्या वारसांना धीर देत साहित्य व संस्कृतीप्रती आपली बांधिलकी त्यांनी व्यक्त केली. या भेटी विशेष चर्चेचा विषय ठरल्या.याच वेळी, उपजिल्हा प्रमुख व्यंकट पाटील, अशोक पाटील राजूरकर, युवासेना प्रमुख नामदेव पाटील सोबत डॉ. धुमाळे, डॉ. शिकारे आणि अ‍ॅड. अंकुशराजे जाधव यांनी शिवसेना पक्षात प्रवेश करून बालाजी पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला असून त्यांच्या सोबत संपूर्ण दौऱ्यात सक्रिय सहभाग नोंदवला.

एकूणच, देगलूर, मुखेड व बिलोली तालुक्यात शिवसेना पक्षाची ताकद वाढत असून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा दौरा महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

# प्रशासनाने आश्वासन पुर्ण न केल्याने माधव शिंदे यांचे परत आमरण उपोषण



**दैनिक वादळ वार्ता**
**हिमायतनगर । प्रतिनिधी**

शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी नगरपंचायत प्रशासनाने जागा उपलब्ध करून द्यावी या मागणीसाठी स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडच्या वतीने माधव किशनराव शिंदे यांनी ३१ मार्च रोजी उपोषण सुरू केले.यापुर्वी स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडच्या वतीने १७ फेब्रुवारी रोजी माधव शिंदे व बालाजी ढोणे यांनी सतत चार ते पाच दिवस आमरण उपोषण केले असताना नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने एका महिन्याच्या आत जागा उपलब्ध करून देण्याचे लेखी आश्वासन देऊन नगराध्यक्ष व प्रशासनाने उपोषण सोडवले पण एक महिना उलटला तरी पण प्रशासनाने लेखी आश्वासन देऊन सुद्धा आश्वासन पुर्ण न केल्याने प्रशासनाने फसवणूक केल्यामुळे स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड आक्रमक होत काही अनुचित प्रकार घडला तर यास प्रशासन जबाबदार असल्याचे निवेदन देऊन नगरपंचायत कार्यालयाच्या पटागणा बाहेर माधव शिंदे यांनी उपोषण सुरू केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077